# नेहरू महाविद्यालय

## नेरपरसोपंत, जि. यवतमाळ

नॅक द्वारा मानांकित
ब ++
श्रेणी




२०२४–२५

# ✻ क्षणचित्रे ✻



एम.ए.मराठी विभाग, विद्यापीठ मेरीट विद्यार्थीनीचा गुणगौरव




रा.से.यो. निवासी शिबीर पाथ्रड गोळे



मराठी विभाग, सत्कार समारंभ व व्याख्यान




विद्यार्थीनी जागरुकता सप्ताह




राज्यस्तरिय योगासन स्पर्धेत सहभागी विजू राठोड




अ.भा.आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभागी विश्वजीत इंगोले

नेहरू शिक्षण संस्था, नेरपरसोपंत
व्दारा संचालित
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

# नेहरू महाविद्यालय

(कला-वाणिज्य-विज्ञान)

नॅक व्दारा ब+ श्रेणी मानांकित

* आचार्य पदवी संशोधन केंद्र
* पदव्युत्तर अभ्यास केंद्र
* वरिष्ठ महाविद्यालय (कला-वाणिज्य-विज्ञान)
* कनिष्ठ महाविद्यालय (कला-वाणिज्य)
* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र

# शब्दवेध

वार्षिकांक - २०२४ - २५

*** प्रकाशक :**

डॉ.श्री.अशोक एन. भोरजार

प्राचार्य

नेहरू महाविद्यालय नेरपरसोपंत – ४४५१०२,

जि. यवतमाळ

*** शब्दवेध :**

वार्षिकांक : २०२३–२४

*** मुखपृष्ठ :**

श्री. धम्मप्रकाश धाकडे, अमरावती

*** मुद्रक :**

श्रीकृपा प्रिंटर्स राठी नगर, अमरावती,

जि. अमरावती मो. ९३७०६६३०३४

शब्दवेध, हा वार्षिकांक डॉ.श्री.अशोक एन. भोरजार, प्राचार्य नेहरू महाविद्यालय नेरपरसोपंत, जि. यवतमाळ यांनी प्रकाशित केला आहे.

या अंकातील मतांशी व विचारांशी, नेहरू शिक्षण संस्था, नेरपरसोपंत प्राचार्य, नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंत, संपादक मंडळ व वार्षिकांक समिती सहमत असतील असे नाही.

लेखी अनुमतीशिवाय संपुर्ण अथवा अंशतः पुनः प्रकाशन वा पुनःप्रसारण मनाई

# ✻ आमचे प्रेरणास्थान ✻



अपयश केवळ तेव्हाच येते, जेव्हा आपण आपले आदर्श, उद्दिष्टे आणि तत्वे विसरतो.

– पंडित जवाहरलाल नेहरू

# नेहरू शिक्षण संस्था, नेरपरसोपंत

## - कार्यकारिणी -



श्री. परमानंदजी अग्रवाल
अध्यक्ष



श्री. रवि परमानंदजी अग्रवाल
कार्यकारी अध्यक्ष



श्री. राजेंद्र पुं. चिरडे
उपाध्यक्ष



श्री. हाजी मजहर खान पठाण
सचिव

## -------------* कार्यकारिणी सदस्य *------------



श्री. राजेश बनवारीलालजी अग्रवाल



श्री. सुनिल जगन्नाथजी धोटकर



डॉ. मोहन जवाहरलालजी शर्मा



डॉ. संजय दत्तात्रय काळे



श्री. यश रवि अग्रवाल



श्री. भाष्कर वामनराव सोनोने



सौ. ममता रवि अग्रवाल

# शब्दवेध

## ✻ संपादक मंडळ ✻



डॉ. प्रविण बनसोड



डॉ. संदीप अं. काटोले



प्रा. अहमर अब्बास खान



प्रा. फिरोज पी.सहाळा

## ✻ विद्यार्थी संपादक मंडळ ✻



कु. जान्हवी भोयर

(मराठी)



कु. साक्षी विठ्ठल राठोड

(इंग्रजी)



कु. मरियम अमीन नूर

(उर्दू)



## FROM PRINCIPAL DESK

It gives me great pleasure to publish ***Shabdavedha*** Annual 2023-24 of Nehru College Ner Parasopant. Along with various educational activities in the college, the activities to develop other artistic qualities of the students are continuously implemented in the college.

I think ***Shabdavedha*** Annual Magazine is important for students to express themselves by reflecting on various topics. The purpose of the annual magazine is to present an account of various happenings in the college and also to visualize the thoughts and feelings of the students through writings. For that purpose, we are working to make students active in the field of art.

Every year ***Shabdavedha*** is racing with new concepts. All my fellow professors on the editorial board who have given students a different topic every year and encouraged them to write have provided valuable support for this issue. The Editor congratulates the Board and hopes that the readers will respond to this issue.

**Dr. A.N.Bhorjar**
Principal

# संपादकीय...

सत्र २०२३-२४ च्या शब्दवेध वार्षिकांकाचा नवीन अंक आपल्यासमोर सादर करतांना मनस्वी आंनद होत आहे. विद्यार्थ्यांनी आपले विचार मोकळेपणे मांडण्यासाठी शब्दवेश हे सक्षम व्यासपीठ ठरल्याचा सुध्दा आनंद आहे. देशातील तरूणांचे प्रतिनिधी असलेल्या नेहरू महाविद्यालयाचा विद्यार्थी सामाजिक समस्येबद्दल लिहितो तेव्हा, तरूणांमध्ये असलेली सामाजिक जाणीव अधिक स्पष्ट होते. स्त्रीभ्रूण हत्या किंवा पर्यावरणाच्या समस्येवर परखड मत मांडणारे विद्यार्थी प्रेम, मैत्री या तारूण्य सुलभ भावभावनांसोबतच सामाजिक प्रश्नाकडे गार्भियाने बघून आमचा विद्यार्थी लिहिता झाला याचे समाधान आहे.

व्यक्ती म्हणून विद्यार्थ्यांमधील विविध कला गुणांचा विकास होणे हे शिक्षणाचे महत्वाचे उद्दिष्ट उराशी बाळगून महाविद्यालयाची वाटचाल सुरू आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची अभिरूची निर्माण व्हावी व वाचता वाचता त्याने अभिव्यक्त व्हावं, लेखनासाठी प्रवृत्त व्हावं यासाठी विविध संकल्पना घेऊन **शब्दवेध** वार्षिकांक दरवर्षी प्रकाशित करण्यात येतो.

नेहरू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष **सन्माननीय श्री. परमानंदजी अग्रवाल**, मा. कार्यकारी अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, मा. सचिव व व्यवस्थापन परीषदेची सर्व सन्माननीय कार्यकारीणी आणि प्राचार्यांच्या प्रोत्साहनाने या अंकाला गुणवत्ता प्राप्त झाली आहे. या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत.

महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद, ग्रंथालय विभाग यांनी आम्हाला जे सहकार्य केले त्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

टाईप सेंटीगचे उत्कृष्ट काम करणारे व आर.जी.एन्टरप्राईजेस चे संचालक श्री. रविंद्र शेंडे यांचे आम्ही आभारी आहोत.

सोशल मिडीया आणी इंटरनेटच्या या युगात वार्षीक अंकाचे स्थान अढळ आहे; याबद्दल आम्ही आशावादी आहोत. आमच्या प्रयत्नातून साकारलेल्या शब्दवेध वार्षिकांकाचे आपण मनापासून स्वागत कराल अशी आशा आहे.

*** संपादक मंडळ ***

**डॉ.प्रवीण श्री. बनसोड** | **डॉ. संदीप ए. काटोले** | **प्रा. अहमर अब्बास खान**

**कु. जान्हवी भोयर** | **कु. साक्षी विठ्ठल राठोड** | **कु. मरियम अमीन नूर**

# शब्दवेध

वार्षिकांक – २०२४ – २५

# मराठी
# विभाग



# मुलगी का नको ?

कु. तनु पवार, बी.ए.भाग ३

सर्वांना आई आवडते. बहीण, मैत्रीणही आवडते, पण मुलगी का नाही ? मुलींना या समाजात पुरूषाबरोबर स्थान का मिळत नाही ? स्त्री-पुरूष समानता पाहिजे हे सगळे म्हणतात, पण त्यानुसार का वागत नाही ? या विश्वाला निर्माण करणारी स्त्री आहे, पण तिचीच हत्या का ? तिला मानाचे स्थान का मिळत नाही ? कां तिला पायाखालची दासी किंवा पायातली वहाण म्हणून संबोधले जाते ? असे अनेक प्रश्न माझ्या मनात उभे राहतात.

सरस्वतीला आपण विद्येची आराध्य देवता मानतो. आराध्य देवता म्हणून तिची पूजा करतो. सरस्वती माता कोण? तर एक स्त्रीच ना, आपण मानाचे स्थान सुध्दा देवू शकत नाही. या समाजात स्त्रीला अबला म्हणून मानले जाते तर, दुर्गा देवीला आपण का मानतो ? तिचे नवरात्र उत्सव का करतो ? पण आपण एका स्त्रीला अबला कशावरून मानतो असा प्रश्न माझ्या मनात निर्माण होतो.

एक स्त्री जर शिवाजी सारखा शूरवीर पुत्र घडवू शकते, त्या स्त्रीला आपण दासी म्हणून का संबोधतो. या जगात सर्व दु:ख सहन करण्यासाठी फक्त स्त्रीचाच जन्म झाला आहे का ? का तिलाच वेळोवेळी अग्नीपरीक्षा द्यावी लागते ? सीता ही पवित्र होती, पण तिला अग्नीपरीक्षा द्यावी लागली का ? हे सगळं सहन करण्यासाठी एका स्त्रीचा जन्म होतो कां ... ?

आतापर्यंत इतिहासात पाहिले तर शिवाजी कोणी घडविला तर जिजामातेचे नाव येते, राम, कृष्ण यांना घडविणारी कोण ? एक स्त्री जग घडवू शकते आणि उद्‌ध्वस्त सुध्दा करू शकते. एवढी ताकद एका स्त्रीमध्ये आहे. जर स्त्रीचं अस्तित्व नष्ट झालं तर हे जग नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही असा विचार कोणीच करीत नाही आणि गर्भामध्येच मुलीची हत्या करतात.

अनेक घरामध्ये मुलींना मुलांपेक्षा खालच्या दर्जाची वागणूक दिली जाते. मुलांना ज्या सवलती घरामध्ये दिल्या जातात त्या मुलींना दिल्या जात नाही. मुलगा आणि मुलगी यात फरक काय ? तर म्हटल्या जाते की, मुलगा वंशाचा दिवा असतो, तर मुली दुसऱ्यांचे धन आहे असा समाजाचा विचार आहे. जर मुलांप्रमाणे मुलींना समान वागणूक दिली तर स्त्री भ्रूणहत्या हा शब्द मुळीच राहणार नाही.

स्त्री भ्रूणहत्या थांबवायची असेल तर आपल्या मानसिकतेला बदलावे लागेल. मुला-मुलींना समान हक्क द्यावे लागेल, तेव्हाच स्त्री भ्रूणहत्या हा शब्द निरर्थक होईल. शेवटी मला एवढेच म्हणायचे आहे की,

''नका घेऊ चिमुकल्या जिवाचा जीव,<br>
तिला हे जग पाहू द्या,<br>
जो हक्क मुलांना तोच हक्क मुलींना द्या''

याप्रमाणे समाजाचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर आपणाला मुलां-मुलींमध्ये समान दृष्टिकोन अंगिकारावा लागेल. हिच सामाजिक चिंतनाची नवीन सूत्र सर्वांना जोपासावी लागेल.



# ध्येयनिष्ठ जीवन

कु. ऋतुजा रंगारी , बी.ए.भाग २

मित्र हो आज खरोखर विचार करण्याची गरज आहे दोष कुणाचा ? आजचा विद्यार्थी अतिशय गोंधळलेल्या अवस्थेत आहे. बहुतांश विद्यार्थ्यांकडे तर आपले ध्येयच निश्चित नाही. नेमकं करायचं काय ? आपण कॉलेजमध्ये कशासाठी येतो ? खरोखर आपण शिक्षण घेत आहोत का ? की निव्वळ टवाळक्या करीत आहोत. कधी कधी तर असे वाटते की, उद्याचा भावी पिढीचा नागरिक अकार्यक्षम तर होणार नाही ना ? असे अनेक प्रश्न आहेत आणि त्याची उत्तरे मला आज शोधायची आहे.

साधारणत: शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांचा प्रवास सुरू होतो आणि महाविद्यालयीन जीवनापर्यंत येऊन पोहचतो. परंतु या मधल्या काळात मात्र विद्यार्थ्यांचे जे गैरसमज होतात त्यामुळे विद्यार्थी अपयशाच्या खाईत ढकलला जातो. बहुतांश विद्यार्थ्यांचा असा समज असतो की शिक्षण हे गरिबांचे नाही. जिथे-तिथे डोनेशन त्यामुळे शिक्षण हे श्रीमंतांनीच घ्यावे. गरिबांनी नाही. बहुतेक विद्यार्थी शिक्षण सुरू असतांना नीट अभ्यास करीत नाही. अभ्यासाचे नीट नियोजन करीत नाही. वेळ हातातून निसटत असते तरी पण विद्यार्थ्याचे ध्येय निश्चित होत नाही. ज्या वेळेत अभ्यास करायला हवा त्या काळात मात्र विद्यार्थी अक्षरश: अभ्यास टाळत असतात. ते म्हणतात ना, ''शांततेच्या काळात सराव केला तर युध्द काळात रक्त सांडत नाही''.

नंतर परीक्षा होतात आणि हातात निकाल येतो. मग वाट लागते ती महाविद्यालयाची.

बहुतेक वेळा नामांकित कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला नाही तर आपण निराश होतो. पण छोट्या कॉलेजमधून सुध्दा आपण पदवी मिळवू शकतो. परंतु फरक एवढाच असतो तिथे नसतात सुख सुविधा पण शिक्षण मात्र तेच असते जे नामांकित कॉलेजमध्ये असते. आपण चांगले मार्क्स मिळविले तर सरकारकडून शिष्यवृत्ती दिल्या जातात. आपली लायकी असते का ती मिळविण्याची ? मग आपणच कुठे तरी कमी पडतो ना. मग दोष कुणाचा ?

आपण गरीबातील गरीबांना परवडेल अगदी एवढया खर्चाने पदवी पूर्ण करू शकतो. नंतर राहिला प्रश्न प्राध्यापकांचा जर विद्यार्थी शिकायला तयार असेल तर असे कोणतेच प्राध्यापक नसतात की ते शिकविणार नाही. मग आपल्यात आवड असली पाहिजे शिकण्याची आणि जर आपल्यामध्ये इच्छा असेल तर प्राध्यापक सुध्दा आपल्याला तेवढ्याच मदतीने मार्गदर्शन करतील.

नंतर पदवी पूर्ण झाल्यावर आपल्याला अनेक पर्याय खुले होतात. तहसिलदार, बि.डी.ओ.,

आय.एस.,आय. पी.एस., बँकींग, रेल्वे असे अनेक प्रकारची क्षेत्र स्पर्धा परीक्षा देवून आपल्याला निवडता येतात. आणि जर तीव्र इच्छाशक्ती, निश्चित ध्येय आपल्याजवळ असेल तर आपण कोणतीही स्पर्धा परीक्षा सहज पास होवून समाजात एक यशस्वी व्यक्तिमत्व होऊन इतरांसाठी नेहमी प्रेरणास्थान होऊ शकतो.

मग यशस्वी होण्यासाठी करायचं तरी काय तर माझ्या मते सर्वात आधी आपल्या पळवाटा बंद करायला हव्या. माझ्याजवळ पैसा नाही. मी हुशार नाही. मी गरीब आहे. जर हाच विचार आंबेडकरांनी केला असता तर कदाचित ते आज भारताच्या संविधानाचे शिल्पकार, घटनाकार नसते. हा विचार न्यूटनने केला असता तर जगाला गुरूत्वाकर्षण म्हणजे काय माहीत झाले नसते.

जेव्हा न्यूटन झाडाखाली बसला असतांना त्याच्या डोक्यावर सफरचंद पडला तेव्हा त्याला प्रश्न पडला की, हा सफरचंद माझ्या डोक्यावर का पडला वर का नाही गेला आणि त्याचा शोध घेण्यासाठी त्याने प्रयत्न केला. तेव्हा गुरूत्वाकर्षणाचा शोध लागला. म्हणून आपल्याला प्रश्न पडायला पाहिजे. जेव्हा आपल्यासमोर प्रश्न, अडचणी निर्माण होतात, समस्या निर्माण होतात तेव्हा यशाच्या मार्गात आपलं पहिलं पाऊल पडतं. आणि जेव्हा त्या समस्या सोडविण्याकरिता आपण प्रयत्न करतो तेव्हा आपण दहा पाऊले पुढे जातो. आणि समस्यांना घाबरून पळवाटा शोधतो तेव्हा मात्र यशाच्या मार्गातून आपण शंभर पाऊले मागे सरकतो. जग हे उगवत्या सूर्याला नमस्कार करतं मावळत्या सूर्याला नाही. त्याचप्रमाणे जग हे यशस्वी माणसाला नमस्कार करतं हरलेल्या आणि अयशस्वी माणसाला नाही. आपण स्वत:मध्ये इतका प्रवाह निर्माण करायला हवा की जर आपल्या समोर कितीही मोठा बांध उभा केला तर तोडून न्यायला हवा. माझे लक्ष्य त्या वाघासारखे असायला पाहिजे जो वाघ आधी दडून बसतो आणि कळपातील एक शिकार निश्चित करतो आणि पूर्ण ताकदीनिशी त्या शिकारीवर तुटून पडतो. दुसऱ्याकडे तो बघतही नाही. माझी इच्छाशक्ती त्या मुंगीसारखी असली पाहिजे जिच्या मार्गात कितीही अडथळे निर्माण झाले तरी ती मार्ग बदलत नाही. शेवटी सागर कितीही मोठा असला तरी किनारा मात्र सापडतोच ना.

नेपोलियन लग्नाच्या दुसऱ्या रात्री युध्दावर गेला म्हणून तो एक महान योध्दा बनला. ज्याने जवळपास अर्धे जग जिंकले. तमाशातील बाईचा मुलगा डॉ. किशोर शांताबाई काळे होतो. कला शाखेमध्ये पदवी घेवून वयाच्या २२ व्या वर्षी स्वप्नील औरंगाबादकर आय.ए.एस. होतो तर मग मी का नाही ? असे प्रश्न जोपर्यंत निर्माण होणार नाही, तोपर्यंत मी आणि आपण यशस्वी होणार नाही. एकदा का आत्मविश्वास जागा झाला तर

जिंकण्यासाठी जग अपुरे पडेल. आणि मग कोणीही रोखू शकणार नाही ना गरिबी, ना भ्रष्टाचार, ना पैसा कोणीच नाही आणि अशी कोणतीच परीक्षा राहणार नाही जी यशस्वी होणार नाही आणि एकदा का यशस्वी झाले तर मग करायचं व्यवस्था परिवर्तन. जर तहसीलदार झाले तर तहसील विकसित करू शकतो. आय.ए.एस. झाले तर जिल्हा विकसित करू शकतो. आणि व्यवस्थेत राहूनच व्यवस्था परिवर्तन होवू शकते. व्यवस्थेच्या विरोधात जाऊन नाही.

एक गोष्ट सांगाविशी वाटते जेव्हा सॉक्रेटीसकडे एक व्यक्ती आला आणि प्रश्न विचारला की, ध्येय हे कसं असतं? तेव्हा त्यांनी काहीच उत्तर दिलं नाही आणि मागे मागे येण्यास सांगितले. तो व्यक्ती त्यांच्या मागे मागे जावू लागला. मधात एक नदी होती. नदीतून जात असतांना पाणी छातीपर्यंत आले तेव्हा सॉक्रेटीसने त्याचे मुंडके धरले आणि पाण्यात दाबले. तो व्यक्ती अतिशय तडफडू लागला आणि पूर्ण ताकदीनिशी त्याचे मुंडके वर काढण्याचा प्रयत्न करु लागला. एवढ्यात सॉक्रेटीसने त्याचे मुंडके सोडले. तेव्हा तो व्यक्ती त्यांच्यावर रागावला आणि म्हणाला भल्या माणसा मी तुला ध्येय कसे असते हे विचारायला आलो आणि तु माझे मुंडके पाण्यात दाबले. तेव्हा सॉक्रेटीसने प्रश्न केला की जेव्हा तुझं मुडकं पाण्यात होते तेव्हा तुला सर्वात जास्त कशाची गरज भासली? तेव्हा त्या व्यक्तीने उत्तर दिले ऑक्सिजनची. तेव्हा सॉक्रेटीसने उत्तर दिले ध्येय सुध्दा असेच असले पाहिजे. ज्याच्याशिवाय कशाचीही गरज असायला नको. आपल्या ध्येयावर आपलं प्रेम असलं पाहिजे तेव्हा यशस्वी होण्यापासून आपल्याला कोणीही रोखू शकत नाही.

आज अतिशय स्पर्धेच युग आहे. या स्पर्धेत जर आपल्याला टिकायचं असेल तर आता हिच योग्य वेळ आहे. विचार केला नाही तर पश्चातापाशिवाय हातात काहीच उरणार नाही. अगदी काहीच नाही.

शेवटी इतकच सांगेन, ''मी जन्म घेतला तो जिंकण्यासाठी आणि फक्त जिंकण्यासाठीच''



# शिक्षक हे समाजाचे शक्तीपीठ

कु. नम्रता चिरडे, बी.ए.भाग २

गुरु हा सुखाचा सागरु । गुरु हा प्रेमाचा आगरु गुरु हा धैर्याचा डोंगरु । कदा काळी डळमळी ना ।।... गुरु हा घाली ज्ञानांजन। गुरु हा दाखवी निजधन गुरु हा सौभाग्य देऊन । साधू बोध नांदवी ।।... गुरु हा भक्तीचे मंडण । गुरु हा दुष्टांचे दंडण गुरु हा पापाचे खंडण । नानापरी वारीतसे ।।...

ज्ञानेश्वरांचे वरील उद्बोधनपर ओवी ह्या गुरुची महती वर्णवीणारे धुसर संगमवरी दगडाला स्वप्नशिल्प पडावे, इतपत त्याची छाया पसरलेली आहे. पण कोठे मनाच्या विशालकाय वृक्षावरी आत्मज्ञान होण्यासाठी गुरुच्या मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता असते. कोणतेही कार्य सुरु करण्यापूर्वी गुरुंचे चितन अत्यंत आवश्यक आहे आणि गुरुकृपा झाल्यावर काय होणार नाही? म्हणूनच,

गुरु ब्रम्हागुरु विष्णू गुरु देवो महेश्वराः। गुरु साक्षात परब्रम्ह तस्मेः श्री गुरवे नमः।।

गुरुहे ब्रम्हस्वरुप बनून शिष्याच्या ज्ञानाची उत्पत्ती करतात. विष्णूरूप बनून शिष्याच्या ज्ञानाचे पालन करते. तर गुरु हे श्री शंकर बनून शिष्याच्या क्लेबाची समाप्ती करतात. आणि अज्ञानाचा अंधःकारनाहीसा करतात आणि तेथे शिष्य गुरुसान्निध बसून नम्रता, जिज्ञासा, सेवा व वंदन करून अज्ञ पानाचे निराकरण करून घेतो. श्री समर्थ रामदास म्हणतात,

परी ते सरिता मिळणी मागे ।<br>
वाहळमानिजेत जग ।<br>
तैसा नोहे शिष्य वेगे।<br>
स्वामीच होय ।।

जर एखादी नदी समुद्राला मिळाली की ती समुद्रच बनून जाते, त्याचप्रमाणे शिष्य गुरुशी एकरूप झाला, तर तो गुरुच बनून जातो, असा हा गुरुंचा महिमा आहे.

प्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ व जेष्ठ गांधीवादी विचारवंत विनोबा भावे म्हणतात, शिक्षक विद्यार्थी परायण असावेत. विद्यार्थी शिक्षक परायण असावा. दोघेही ज्ञान परायण असावेत. गांधीजी म्हणतात, भगवद्गीता जशी कुरुक्षेत्रावर सांगितली गेली तसे शिक्षण हे जगता दिले पाहिजे. साने गुरुजी म्हणतात, शिक्षकाचे जीवन म्हणजे पवित्र नंदादीप असायला हवे कारण एका पिढीतील ज्ञान व कौशल्य दुसऱ्या पिढीपर्यंत नेऊन पोहचविणारा एक महत्त्वाचा दुवा आहे. त्यांच्यामुळेच संस्कृतीचा दिवा तेवत राहिला आहे. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज म्हणतात, शिक्षका इतका समाजात दुसरा कोणही मोटा नाही. चांगल्या शिक्षकाचा सन्मान हा संस्कृतीचा, सत्याचा व ज्ञानाचा सन्मान आहे. बाळासाहेब भारदे म्हणतात, शिक्षक हे सामाजिक कुविचारांचे परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे.



शिक्षक हा मुलांमधील गुण ओळखून त्यांची कदर करणारा असावा. त्यांच्याकलागुणांना प्रोत्साहन देणारा असावा, त्यांच्याजवळ कलावंताचे हृदय असावे कारण ते हजारो विद्यार्थ्यांना घडविणारा जातीवंत कलाकार असतो. ते राष्ट्र निर्मात व समाज घडविणारे शिल्पकार असतात. गुरु हे भारतीय संस्कृतीचे बलस्थान आहे. शिक्षण म्हणजे विवेक

आणि शिक्षक म्हणजे सदाचार. शिक्षक ही व्यक्ती नसून, मोठी शक्ती आहे. शिक्षक हे समाजाचे शक्तीपीठच आहे.

आईवडील मुलांना घरीज्याप्रमाणे संस्कार देते, तसे ते वागतात. तसेच शिक्षक हे शिक्षण जीविताचा पाया. शिक्षक हे विद्यार्थी सुसंस्कारी बनविण्याच्या दृष्टीने एकप्रमारे वृक्षच आहे. शिक्षकांची भूमिका म्हणजे रातराणीच्या चालकासारखी आहे. सारे प्रवासी आणि वाहक झोपले तरी डोळ्यात तेल घालून या साऱ्यांना निश्चित ठिकाणी पोचविण्यासाठी चालकाला जागे राहावेच लागते. आपण जागल्या आहोत, प्रेमळ, विचारी अन् राष्ट्रभक्त विद्यार्थी आपण नक्कीच तयार करू शकतो आपण राष्ट्राचे शिल्पकार आहोत, मनात आणू तर असे कित्येक विद्यार्थी आपण घडवू शकतो. दुर्दम्यउत्साह, उदंड, प्रयत्न राष्ट्रप्रेम आणि समतेची जाणीव जर आपल्याठायी असेल तर आपण सुसंस्काराचा धडा नव्या पिढीला देऊ शकतो... नव्हे दिलाच पाहिजे....

महाराष्ट्रातील मुलांना शाम करण्यास तुम्ही आम्ही साऱ्यांनीच साने गुरुजी झाले पाहिजे आणि विद्यार्थ्यांना सांगितले पाहिजे.

घाण जगातील करुनी दूर, घाण नातील करुनी दूर, स्वर्ग निर्मू तो या पृथ्वीवर, बदलवू सारा नूर, आम्ही देशाचे मजूर, आम्ही देशाचे मजूर ।।

या कोवळ्या कळ्या माजी लपले ज्ञानेश्वर, रविंद्र, शिवाजी, विकसता प्रगटील समाजती, शेकडो महापुरुष ।।

या भावनेने जे विद्यार्थी घडवितात, ते शिक्षक गुरु म्हणून सर्वत्र वंदिल्या जातात. आदर्श समाजाची निर्मिती करून राष्ट्र तेजस्वी करण्याची क्षमता ही गुरुमध्ये असते. गुरु म्हणजे केवळ विद्याध्येयन करून घेणारा नसून यशस्वीजीवनाची मुलतत्त्वे व जीवनमूल्ये विद्यार्थ्यांच्या जीवनात उत्तरविण्याचा प्रयत्न करतो. ५ सप्टेंबर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. राधाकृष्णन म्हणतात, त्यागी जेवढे निजपतील तेवढा राष्ट्रास फायदा होईल. विद्वानांनी आपल्या समाजात विद्यादान करावे आणि विद्येचाच भिक्षेकारी गावामध्ये व्हावे असे महात्मा फुले म्हणत. जो चांगल्या गोष्टींच्या मागे लागतो तोच आयुष्यात पुढे जातो. विद्यार्थ्यांतील सुप्त असलेल्या गुणांना वाव आणि प्रोत्साहन गुरुंकडून मिळाले पाहिजे. कार्लाईन म्हणतात, अनुभव हा सर्वोत्तम शिक्षक त्याची फी मात्र नंबर असते. शिक्षक म्हणजे केवळ शब्दांचा अर्थ शिकविणारा नव्हे तर, विद्यार्थ्यांतील वृत्तीच्या, शक्तीच्या विकासाला व त्यांच्यातील बुध्दीमत्तेला धार देणारा खरच म्हणजे खरा शिक्षक होय. सुप्त चैतन्य व निद्रिस्त शक्ती जागृत करण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षक होय.

# मोबाईल शाप की वरदान ?

आजच्या काळात सर्वच क्षेत्रातील तंत्राज्ञान फारच विकसित झालेले आहे. मोबाईलचे तंत्रज्ञान तर इतके वाढले आहे की ती एक क्रांतीच झालेली जाणवते आज प्रत्येकाच्या हाती मोबाईल आलेला आहे. घरा घरातील प्रत्येक व्यक्ती जवळ मोबाईल पहावयास मिळत आहे. पण ज्यावेळी एखादे नविन तंत्रज्ञान निर्माण होते तेव्हा ती मानवी सुखसोयी या दृष्टीनेच उदयास येते मानवाचे कल्याण साधणे हाच एकमेव हेतू या तंत्रज्ञानामागे असतो मोबाईल सुध्दा एक विकसित स्वरूपाचे तंत्रज्ञान आहे. ते शाप कसे असेल?

एखाद्या दूर देशाच्या दूर ठिकाणाची इत्यंभूत माहिती मोबाईल वरून घेवू शकतो मोबाईल व्दारे एखाद्या ठिकाणचे हवामान, तापमान आपण समजू शकतो आवडते संगीत ऐकू शकतो इतके सारे फायदे पाहिल्यावर मोबाईल वरदान नाही असे कोण म्हणेल? पण त्याचा वापर मात्र योग्य तऱ्हेनेच केला गेला पाहिजे हे ही तितकेच सत्य आहे. मोबाईलचा नको तितका व नको तसा अतिरिक्त वापर करणे सर्वार्थाने चूक आहे. याशिवाय मोबाईलचा अतिरिक्त वापर हा अनेक शारिरिक व्याधींना निमंत्रण देणारा असतो. मेंदू, किडनी, हृदय इ. अवयवावरही मोबाईल फार मोठा परिणाम करू शकतो. एकुणच काय तर मोबाईलचा योग्य वापर केला तर मोबाईल वरदानच आहे, नाही तर शाप!

प्रद्युम्न भोसले, बी.ए. भाग ३

पण ज्या वेळी एखादे नविन तंत्रज्ञान निर्माण होते तेव्हा ती मानवी सुखसोयी या दृष्टीनेच उदयास येते मानवाचे कल्याण साधणे हाच एकमेव हेतु या तंत्रज्ञानामागे असतो. मोबाईल हा आजच्या काळातील प्रत्येकाच्या जीवनातील एक अविभाज्य घटकच बनला आहे. त्याचा तसा वापर करणे हे नुसते अयोग्यच नव्हे तर कित्येकदा ते घातकच आहे. या शिवाय मोबाईलचा अतिरिक्त वापर हा अनेक शारिरीक व्याधींना निमंत्रण देणारा असतो .....काय तर मोबाईलचा योग्य वापर केला तर मोबाईल वदरान आहे नाही तर शाप!



# मराठी भाषा संवर्धन

कु. साक्षी राठोड, बी.ए. भाग ३

आपली मराठी भाषा ही खूप सुंदर भाषा आहे. मराठी ही भारतातील २२ अधिकृत भाषांपैकी एक भाषा आहे. भारतात सर्वांत जास्त बोलली जाणारी ही तिसरी भाषा आहे. आपल्या महाराष्ट्राची राजभाषा मराठी आहे.

मराठी भाषेचे महत्व खूप आहे. दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी राजभाषा दिवस म्हणून आपण उत्साहात साजरा करतो. या दिवशी मराठी साहित्यातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे जेष्ठ कवी श्री. विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस असतो. त्यांनी अनेक मराठी कविता, नाटक, कथा इ. चे विपुल लेखन केले. 'विशाखा' हा काव्यसंग्रह मराठी काव्याचे कायमचे भूषण ठरले आहे. कवी कुसुमाग्रजांनी मराठीला ज्ञानभाषा बनवण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

मराठी भाषा ही आपल्या महाराष्ट्राची मायबोली आहे. तिच्यात वात्सल्याचे व संस्काराचे बोल आहेत. अनेक खेड्यात रोज मराठी भाषा बोलली जाते. मराठी भाषा ही जरी रांगडी वाटत असली तरी तिच्यामध्ये एक आगळेपण जाणवते मराठी ही महाराष्ट्राची ओळख व जान आहे.

मराठी भाषेतील साहित्यसंपदा विपुल आहे. या मराठी भाषेने आपल्याला कुसुमाग्रज, बा.भ.बोरकर, केशवसुत, बालकवी, शांता शेळके, प्र.के.अत्रे असे अनेक प्रतिभावंत मराठी साहित्यिक दिलेले आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, संत नामदेव यासारख्या अनेक संतांनी मराठी भाषेचा महिमा सांगितला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचे रक्षण व संवर्धन केले.

आज समाजात मराठीला प्रतिष्ठित भाषेचा दर्जा अजून मिळालेला नाही. मराठी भाषेचा वापर कमीत कमी करण्याकडे लोकांचा कल दिसून येतो. हे असेच दिवसंदिवस चालत राहिले तर मराठी बोली भाषा भाषेतून विभक्त व्हायला फारसा वेळ लागणार नाही. म्हणून मराठी भाषेचे संवर्धन ही काळाची गरज आहे. केवळ आपल्या बोलण्यातून नव्हे तर आचार-विचारातून मराठी भाषा दिसायला हवी. जागतिकरणाच्या या स्पर्धेत आपण सर्वांनी मराठीचा जागर करून तिचे संवर्धन करण्याची जबाबदारी घ्यायला हवी.

लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी !<br>
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी !!

कु. पायल मुंजेवार, एम.ए.भाग १

## विद्यार्थी असावा असा

बुध्दीमध्ये असावा विवेक
हृदयामध्ये असावी करुणा
मातृभूमीवर असावे प्रेम
मन सदैव असावे स्थिर
आत्मविश्वास असावा दृढ
इच्छाशक्ती असावी प्रबळ
धाडसाचे असावे बळ
चेहऱ्यावर असावे तेज
देहामध्ये असावे शक्ती
ध्येय ज्याचे असावे उच्च
सत्य ज्याचा असावा ईश्वर
जीवनामध्ये असावी शिस्त
सूर व वाणी आसावी प्रेमळ
मानवता हेच असावे कुळ
गुरुजनांचा असावा आदर
पालकांवर असावी श्रध्दा
दिनदुबळ्यांचा असावा मित्र
सेवेसाठी असावा तत्पर
मानव सेवेवर असावी भक्ती
चारित्र्य ज्याचे असावे शुद्ध

## शिक्षक खरचं काय असतं...

शिक्षक खरचं काय असतं...
शिक्षक एक नाव असत...
विद्यार्थ्याच्या मनात वसतं...
पेनाची शाही असतं...
वर्गातल्या वर्गात गजबजलेलं नाव असतं...
शिक्षक खरचं काय असतं...
मातीच्या गोळ्याला आकार देणारा
मुर्तिकार असतो..
शिक्षक खरचं काय असतं...
आई वडिलांचं रुप असतं..
स्वर्गातील देव असते.
प्रेमाची योगीनी असतं...
जे विद्या देता देता सरत नसतं...
उरत पण नसतं...

# स्त्री जन्मा तुझी कहाणी...

कु. पल्लवी राऊत, बी.ए.भाग ३

*स्त्री जन्मा तुझी कहाणी,*
*हृदयी पान्हा नयनी पाणी*



स्त्रीची अनेक रुपे आहेत. पूर्ण विश्वाला व्यापूळ राहिलेली स्त्री. उध्यात्माने स्त्रीला दिलेले अनन्यसाधारण महत्व स्त्री म्हणजे ईश्वर व आत्मा यांचे मिलन, विश्वनिर्मिती हे सर्व असूनसुद्धा स्त्री अबला ! पण आज स्त्रीच्या बाबतीत मागे वळून पहिले तर तिची शोकांतिका समोर येते. महाभारताच्या काळापासून आजपर्यंत स्त्रीचा स्वार्थसाठी वापर केला गेला. तिच्याकडून प्रचंड अपेक्षा केल्या गेल्या. जन्माला आपल्यापासून आतापर्यंत अपेक्षा पूर्ण करता करवा ती आपले आस्तित्वच विसरून गेली. मुलगी म्हणून आई- वडील यांची अपेक्षा, पत्नी म्हणून पती समाज. कुटुंबातील सदस्यांची अपेक्षा. आई झाली की मुलांच्या अपेक्षा हे सर्व करतांना स्वतःच्या अस्तित्वाचा विचार तिने कधी केला ? आपल्या पतीसाठी समाजात वावरली सहज व सुरक्षित होइल. प्रचलित समाजान स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले. पण सावित्रीबाई फुले यांच्या कतृत्वाने शिक्षणाची दारे खुली झाली. समाजात प्रत्येक क्षेत्रात स्वतःला पूर्ण पणे झोकून देणाऱ्या स्त्रीची प्रगती दिवसेंदिवस गतीमान होऊन देशाच्या प्रमुख पदावर स्त्री विराजमान झाली. निसर्गाने आढावा बनविलेल्या स्त्रीने आपली शेतीपासुन अवकाशापर्यंत प्रगती केली. स्त्री पुरुषाने बरोबरीने समाजात वावरते आहे. पण स्त्री खऱ्या अर्थाने मुक्त झाली का ? स्त्रीने आज जागे व्हावे व प्रचलीत कर्मठ समाजबंधने झुगारून आपल्या स्त्रीमुक्तीचा झंझावात सुरु करावा. स्त्री मुक्ती म्हणजे काय? हे प्रथम जाणावे. पॅन्ट शर्ट घालून अवेळी घराबाहेर नावाखाली गैर मागीने जाणे. आधुनिकतेच्या नावाखाली जून्या वयस्कर व्यक्तींचा अपमान करून कुटुंब स्वास्थ्य, प्रेम बिघडवून पार्टी समा करणे म्हणजे स्त्रीमुक्ती नव्हे. स्त्री मुक्ती म्हणजे नवीन विचार, आदर्श जोपासून पुढे जाणे. शिक्षणाबरोबर विनय संस्कार व संस्कृती यांची जोपासना करून अंधश्रद्धा झुगारून नवीन विचार स्विकारणे म्हणजे स्त्री मुक्ती. समाजात नवीन विचार स्विकारणे म्हणजे स्त्री मुक्ती. समाजात स्त्रीयांच्या आत्मइच्छेचे प्रमाण वाढत चालले आहे.ही बाब गंभीर नाही का? समस्यांवर उपाययोजना करून त्यातून बाहेर पडण्याचे प्रयत्न केले पाहीजेत, यासाठी समाज व आई- वडील यांचे सहकार्य मोलाचे ठरते.आजची स्त्री सक्षम बनली पाहीजे शिक्षणाबरोबर नवीन विचारधारा घेवून. कारण आजच्या स्त्रीला वाचविण्यासाठी कोणताही कृष्ण येणार नाही. कारण



हे राज्य आहे. अर्माचे आज शिकू पाटीलची पुनरावृत्ती होता कामा नये, यासाठी गरज आहे. शिक्षणाची, विज्ञानाची.

तंत्रज्ञानाची, कास धरुन उत्तरीत्तर प्रगती करणे गरजेचे आहे, नाहीतर पुन्हा रावणाचे राज्य होईल, तिथे तिथे असेल फक्त पैशासाठी, सत्तेसाठी व्यभिचार, अत्याचार शोषण त्या सर्वात स्त्री भरडली जाईल.

आज स्त्री सक्षम बनली पाहिजे. आज आदर्श पिढी व्यामचार, अत्याचार शाषण, या सर्वात स्त्री भरडली जाइल. डोळ्यांवर पट्टी बांधून गांधारीळे पत्नीत्व धर्म निभावला अर्मिलेचे आयुष्य लक्ष्मणाच्या प्रतिक्षेत संपले. अशा अनेक स्त्रीया आहेत ज्या अनिच्छेने जगतात, इतकेच नव्हे तर स्त्री सहनशील आहे. म्हणून अनेकांची संसार शाबूत आहेत, नाही तर पाश्चात्य विचार तिने कधी केला? आपल्या पतीसाठी डोळ्यांवर पट्टी बांधून गांधारीने पत्नीत्व धर्म निभावला उर्मिलेचे आयुष्य लक्ष्मणाच्या प्रतिक्षेत संपले. अशा आज अनेक स्त्रीया आहेत ज्या अनिच्छेने जगतात. इतकेच नव्हे तर स्ती सहनशील आहे. म्हणून अनेकांची संसार शांबून आहेत नाही तर पाश्चात्य पद्धतीने सकाळी लग्न तर संध्याकाळी घटस्फोट झाला असता पण आज गरज आहे स्त्री जागृतीची. डोळसपणे जगण्याची. आपले अस्तित्व शोधण्याची. प्रथम स्त्रीने आपल्या स्त्रीत्वाचा अभिमान बाळगला पाहिजे. मुलगी जन्माला येण्यापासून रोखू नये, यामुळे समाज संतुलन राहीलच.

आज स्त्री सक्षम बनली पहिजे, आज आदर्श पिढी घडवायची असले तर त्यासाठी स्वत: पासून सुरुवात करा. समाजान जे स्वत: ला ज्ञानी शिक्षित समजतात हे लोक ज्ञानाचा उपयोग पैशांसाठी करतात व जुने स्विकारतात. मुळात मुलीला जन्माला घालू इच्छित नाहीत आणि जन्माला घातलेच तर तिला दुय्यम स्थान दिले जाते परिणाम स्वरुप मुलगा भविष्यात आई-वडिलांचे. प्रमाण प्राण घेण्यास मागे पुढे पहात नाही तेव्हा मुलांना दोष देऊ नका. कारण

'मुलं म्हणजे मातीचा गोळा.
आकार दयावा तशी मूर्ती घडते'

आकार आज स्त्रीवर फार मोठी जबाबदारी आहे. उद्याचा आदर्श समाज घडवून समाजाच्या ऱ्हास थांबविणे तिच्या हाती आहे.

'' नारी नारी मत कहो
नारी एक नर की शान
जिससे पैदा हुए है राम,
कृष्ण, हनुमान''



# आजची स्त्री

कु. प्रवर्जा खंडारे
बी.ए. भाग १

आजची स्त्री 'सबला की अबला'
थोडा विचार करा...

असा एक काळ होता, जेव्हा पुरुष प्रधान संस्कृतीत असणाऱ्या स्त्रीयांचा दर्जा आणि त्यातुनही काही सशक्त विचारांच्या स्त्रियाचं झालेलं समाजाला दर्शन ज्यात जिजाबाईंनी स्वराज्याचा हिंदु राष्ट्राचाच विचार शिवबा आपल्या पुत्राला दिला. शिवाजी महाराज घडले त्याच मधल्या काळात स्त्रीचं (अस्तित्व सशक्त केलं. सावित्रीबाईंनी म्हणुन आज उच्चशिक्षित महिला दिसत आहेत. पूर्वीच्या काळात डोकावले तर तेव्हाची स्त्री ही वेदशास्त्र संपन्न आढळते तेव्हा तिला शास्त्राचे शिक्षण दिले जात असे. गार्गी मैत्रेयी, याच्यासारख्या वेदशास्त्र निपुण कैकयीसारख्या युद्धशास्त्रात कुशल असणाऱ्या स्त्रीया सर्व प्रकारच्या विद्याकलात पारंगत होत्या.

आज भारतात मुलींना मोफत शिक्षण दिले जात आहे. तिच्यासाठी नौकरीत राखीव जागा ठेवल्या आहेत व संपत्तीचा वारसा हक्क तिलाही देण्यात आलेला आहे. समान वेतनाचा व समान नागरिकत्वाचा दर्जा देऊन सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्यात आली आहे ज्या कुंटुबात स्त्री-पुरुष समानतेची जाणीव विकसित झालेली आहे. अशा घरातील मुलींनाही स्वताचे छंद, आरोग्य, ध्येय इत्यादी -जोपासण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते व तिचा सर्वांगीण विकास घडवुन त्याणण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्त्रीच्या स्वतःच्या कार्यशक्तीला बुद्धिला आणि कर्तुत्वाला पूर्ण वाव मिळावा आणि समाजात स्त्रीया समान सामाजिक दर्जा मिळावा म्हणून स्त्री-मुक्ती चळवळ निर्माण झाली.
विविध स्त्री-मुक्ती संघटनाच्या माध्यमाद्वारे समाजात आणि विशेषता स्त्रीयांमध्ये जागती निर्माण केली जात आहे. यासाठी स्त्रियांना त्यांच्या हिताच्या कायद्याचे ज्ञान व मदत दिली जात आहे. घटस्फोटित विधवा आणि निरक्षर स्त्रीयांना. मानाचे जीवन जगता यावे म्हणुन आर्थिक मदत केली जात आहे. रोजगार मिळवून दिला जात आहे ही मदत समाजातील सर्व थरांतील सर्व धर्माच्या स्त्रीयांसाठी खुली आहेत. आजची स्त्री हि डॉ, इंजिनियर, शास्त्रज्ञ, प्रशासकीय अधिकारी. वा आमदार अशा महत्वाच्या पदावर काम करीत असली तरी, त्या कर्त्यव्यापेक्षाही ती घरकाम किती करते ? या वरुन समाज तिचे मोठेपणा व कर्तृत्व आजही ठरविते विवाहापूर्वी जोपासलेल्या कला छंद शिक्षण यांच्याकडे विवाहानंतर दुर्लक्ष केले जाते.



# पर्यावरण (Environment)

कु. मोहिनी कोटरंगे
बी.ए. भाग १

पृथ्वीवरील अथवा पृथ्वीच्या कोणत्याही प्रदेशातील मानव तसेच इतर सजीव ज्या परिसरात राहतात त्या परिसरातील सर्व घटक समूह मिळून तयार झालेली परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. पर्यावरणात तापमान, सूर्यप्रकाश, जल, वातावरण इत्यादी अजैवीक घटकाबरोबरच वनस्पती प्राणी, सुष्मजीव इत्यादी जैवीक घटक देखील असतात पर्यावरणातील घटक उदा. तापमान, सुर्यप्रकाश यांच्या पासून जैविक या घटकाच्या आंतर क्रियेतून सजीवाचे आणि निर्जीवाचे मिळून पर्यावरण बनते. अजैविक वातावरणात मृद्रा, जल, वातावरण आणि विकिरण इत्यादीचा समावेश होतो. हे पर्यावरण अनेक वस्तू आणि बलापासून बनलेले असते. त्यांच्या एकमेकावर परिणाम होतो आणि या सर्वांच्या परिणामातून सजीवांच्या परिसरातील समुदाय बनतो. उदा. नदीचा प्रवाह, तापमान, आर्द्रता, पाण्यातील रासायनिक संघटन इत्यादीमुळे त्या परिसरात कोणत्याही वनस्पती व प्राणी यांचे वास्तव्य असते आणि ते कसे हेही समजते.

हवामान हा देखील अजैविक पर्यावरणाचा एक महत्वाचा घटक आहे. हवामानात समाविष्ट असलेले घटक उदा. पाऊस, वारा, हिम, उष्ण, किंवा थंड तापमान व पाण्याचे बाष्पीभवन, आर्द्रता आणि अन्य तत्सम घटकांमुळे सजीव आणि निर्जीवावर परिणाम होतो हवामानाच्या प्रतिकूल स्थितीत सजीव मृत्युमुखी पडतात.

वातावरणातील प्रतिकूल घटकापासून संरक्षण व्हावे म्हणून मानव घरे बांधतो. वेगवेगळ्या प्रकारचे कपडे परिधान करतो आणि अशा स्थितीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो तसेच अजैविक घटकांमध्ये सजीवाचे अवकाश आणि त्यांना उपयुक्त होणाऱ्या विशिष्ट पोषक द्रव्याचा समावेश होतो.

मानवांना राहण्यासाठी जशी जागा लागते तसेच त्यांना विशिष्ट प्रकारचा आकार आणि अन्न घटकांची गरज असते जैविक पर्यावरणात अन्न, वनस्पती, पाणी, आणि यातील आंतरक्रिया तसेच अजैविक पर्यावरण यांचा समावेश होतो. या पर्यावरणात मानव हा महत्वाचा प्रभावी घटक आहे. मानवाचे जगणे व त्यांचे आरोग्य हे त्यांच्या अन्न पदार्थावर अवलंबून असते. सामाजिक व सांस्कृतिक परिसर हा व्यक्तीच्या पर्यावरणाचे महत्वाचे अंग आहे मानवी जीवन अत्यंत प्रगत होत असून बाह्य अवकाशकालीन पर्यावरणाचे चिकित्सकपणे अन्वेषण करण्यात येत आहे. मानवाने आर्थिक, धार्मिक साहित्यिक कलासंस्कृती, विज्ञान, तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे मानवकृत प्रत्येक घटक हे एक स्वतंत्र पर्यावरण म्हणून प्रस्थापित होत आहे. हे मानवकृत पर्यावरण आहे. मानवीकृतीच्या उद्दिष्टानुसार मानवी पर्यावरणाचे सामाजिक पर्यावरण, आर्थिक पर्यावरण, औद्योगिक पर्यावरण, सांस्कृतिक पर्यावरण असे विविध प्रकार केले जातात.



# जागतिक महिला दिन...

कुं. सानिका अलोने, बी.ए. भाग १

ती आई आहे, ती ताई आहे,
ती मैत्रीण आहे, मली पत्नी आहे.
ती मुलगी आहे, ती जन्म आहे, ती माया आहे
तीच सुरुवात आहे. आणि
सुरुवात नसेल तर बाकी सारं व्यर्थ आहे.

जागतिक महिला दिन हा दरवर्षी आठ मार्चला मोठ्या उत्साहात साजरा करतो. कुणाची आई, कुणाची बहिण,कुणाची पत्नी,कुणाची आजी, कुणाची मंत्रीण अशा असंख्य महिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या दिवशी अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये आपल्या कार्याने पुरुषी अहंकाराला गाडून आपले टाकणाऱ्या स्त्रीयांनी त्यांच्या अंगी असलेल्या अमर्यादित क्षमता कधीचा सिद्ध केल्या आहेत. महिलामध्ये अपार शक्ती आणि क्षमता आहेत. व्यावहारीक जगात सागळ्यात क्षेत्रात त्यांनी आपली स्थापिक केली आहे. आपल्या अद्भूत साहस अथक पश्चिम तसेच दूरदर्शी बुद्धिमतेच्या जोरावर विश्वपलटावर स्वतः ची अशी एक ओळख बनविण्यात ती यशस्वी झाली आहे. मानसिक संवेदना, वात्सल्य अशा भावनांनी परिपूर्ण असलेल्या अनेक स्त्रीयांनी जग निर्माण करण्यात मोलाचे योगदान दिले आहे. अशाच या स्त्रीयांचे व्यक्तित्व तसेच कार्यत्वाला संक्षिप्त अशी ओळख करुन देण्याचा प्रयत्न महिला दिनाच्या दिवशी केला जातो. अनेक स्त्रीया आपआपल्या क्षेत्रात आपले नाव लौकिक करत आहेत. आज महिला फेसबुक व अन्य सोशल नेटवर्किंग द्वारे आपल्या गोष्टी सांगत आहेत. जागतिक संदर्भ व देशातील घडामोडींवर त्या आपली भूमिका मांडत आहेत, त्या ठामपणे प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमवत आहेत. देशभरच्या बातम्यांची खबरबात ठेवत आहेत. आज महिला घर आणि ऑफिस या दोन्ही गोष्टी सांभाळत आहे. ८ मार्चला साजरा केला जाणाऱ्या महिला दिनानिमित्त या साऱ्या स्त्रियांच्या कार्याची गौरवाने आठवण काढली जाते. महिला या भूमीवरीती युगप्रवर्तक स्वरुपाचे कार्य करत आहेत. नव्या संस्कृतीची जडणघडण करतांना स्त्रिया, कुठेही कुठेही मागे नाहीत, हे त्यांनी सिद्ध केले आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समस्त स्त्रियांना मन:पूर्वक शुभेच्छा देतांना शेवटी कवितेच्या या ओळीमधून इतकेच सांगला येईल की,

ज्याला स्त्री 'आई' म्हणुन कळली
तो जिजाऊचा 'शिवबा' झाला...
ज्याला स्त्री बहीण म्हणून कळली
तो मुक्ताईचा 'ज्ञानदेव' झाला.
ज्याला स्त्री मैत्रीण म्हणून कळली
तो राधेचा 'श्याम' झाला.... आणि
ज्याला स्त्री पत्नि म्हणुन कुळली तो
सितेचा ''राम'' झाला...
प्रत्येक महान व्यक्तिच्या जीवनात आणि
स्त्रियांचा सिंहाचा वाटा आहे.
म्हणुनच स्त्री-शक्तिला माझा सलाम...



जागतिक महिला दिन

# भारतीय समाज व स्त्री

कु. चंचल पारधी, बी.ए.भाग १

### स्त्री सन्मानासाठी अनिष्ट रूढी-परंपरा संपुष्टात आणणे गरजेचे !

आजची तरुण कारण हेच त्याचे पिढी कायद्याला जुमानत नाही कठोर परिणाम भोगावे लागतात. त्यांना माहीत नाही आहे कायदयाचे शिक्षण शालेय स्तरावर देणे गरजेचे आहे. महिला अत्याचाराचे शिक्षण देणे गरजेचे आहे. माहिला अत्याचाराचे परिणाम काय होतात अभ्यासक्रमात हौल स्त्रियांचण होतात याचे असायला ज्ञान शालेय हवे. जेणेकरून येणारी पिढी गान- सम्मान यांची सुरुवात. समाजातील अत्याचार व ठेवील, त्यांचा आदर कुटेलरी यांबले आपन्याला आपन्या कुटुंबातील, आपच्या कुटुंबातील, अनिष्ट कहींना वाचा भारती आहे फोडून करावी भारतातील प्रत्येक लागेल हे कर्तव्य हिच स्त्रीला महिला दिनी खरी शुभेच्छा.

स्त्रीला खरा सन्मान मिळून देण्यासाठी आपल्या देशामुधील अनिष्ठ रुढी-परंपरा संपुष्टात आणने गरजेचे आहे, कारण आजही आपल्या समाजात अनिष्ट रूढी-परंपरा खुळचट परंपराच्या नावाखाली आजच्या माहीलांना धारेवर धरल्या जाते. आजच्या काळातही भारतीय पुरूषसत्ताक समाजात मुलींनी एखाद्या क्षेत्रात सवोच्च कामगिरी बजावली तरी त्याची बातमी जास्तच ओढुनताणुन घेतली जाते, जुन्या रूढी-परंपरांतून आजही माहीलांवर अत्याचार होतांना दिसत आहेत म्हणजेच आपण कुठेतरी स्त्री सन्मानान कमी पडतांना दिसत आहोत. महिलाना दुय्यम स्थान देण्याची पुरूष मत्तेदारी आजही उच्च, उच्चशिक्षित आणि बाहेरपरदेशी वर्गात जागोजागी दिसत आहे.

घरातील महिलेने घरात राबराब राबणे चुल आणि मुल याच भूमिकेत स्त्रीने असावे. हेच सर्वसामान्य कुटुंबात आजही गृहीत धरण्याचे आढळते. एखाद्या स्त्रीने याविरोधात बंदाचे निशाण उगारल्याचे धाडस दाखवले तर पुरूषकेंद्री मानसिकता उभी ठाकते एकीकडे सामाजात माहीलांविषयी सकारात्मक विचाराच्या योजना आखल्या जातात तर दुसरीकडे कुटूंबातील महिलेच्या आत्मसन्मानाचे महत्व दिले गेण आहे. संपूर्ण जगभर ८ मार्च राजी जागतिक महिला दिन साजरा होत असताना दिसतो, अनेक क्षेत्रात महिलांनी स्वतःचा ठसा उमटवलेला दिसतो. तसेच केंद्र व राज्य सरकार महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना वर्षानुवर्षे राबविताना दिसते, परंतू तरी सुद्धा बहुसंख्य महिला



वंचित,शोषित,अन्यायग्रस्त, बलत्कार यासारख्या अनेक अत्याचाराला चळी पडतांना दिसत आहेत. महिलांना योजनाचा फायदा तेव्हाच होईल. जेव्हा अनिष्ट रूढी-परंपरा पुरुषसत्ताक संस्कृती याला पलीकडे स्त्रीला पाहिल्या जाईल, जोपर्यंत समाजात महिलांना दुय्यम स्थान राहील तोपर्यंत महिला अत्याचार थांबविण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेमध्ये बदल करणे गरजेचे आहे. जसे की बलत्कार किंवा स्त्री खुनाच्या गुन्हेगाराला मृत्यूदंडच दयावा.

महिलांबाबतचे न्यायालयीन खटले १५ दिवसांच्या आत चालवून निकाल जेणे करुन

पुरुषसत्ताक संस्कृतीमध्ये प्रत्येक माणसात भय निर्माण होईल व महिलांना न्याय मिळेल. महिलांवरील अत्याचाराच्या घटना पाहता आज महाराष्ट्रासह भारत देशात प्रतिमा कलंकित होत आहे. महिलांवरील अत्याचारात एक ना अनेक घटना लागोपाठ घडतच आहेत. उत्तर प्रदेश, हरियाणा आंध्रप्रदेश, महाराष्ट्रासह संपूर्ण देशात स्त्री अत्याचाराच थैमान माजले आहे. यासाठी कुठेतरी आपले प्रशासन जबाबदार आहे, कारण कायदा तर आहेच परंतु त्यावर योग्य अंमलबजावनी होत आहेच परंतु बलात्कार आणि माहीला अत्याचारासाठी. कडक कारवाई होणे गरजेचे आहे. ८ ते १५ दिवसांमध्ये महिला अत्याचारावर न्यायालयाने निर्णय लावावा. आणि आरोपीस शक्य तितक्या लवकर कडक शिक्षा द्यावी. जेणेकरून प्रत्येकामध्ये एक दडपण तयार होईल व गुन्हेगाराला गुन्हा करतांना विचार करण्यास भाग पडले, आंध्रप्रदेश एनकॉन्टर प्रमाणेच कायद्याचे उल्लंघन कन करता निर्भया बलात्कार खटल्याप्रमाणे लवकरात लवकर निर्णय लावून आरोपींना फाशिची शिक्षा ठोठवावी. यामुळे जनतेमध्ये कायद्याची भीती निर्माण होईल, गुन्हा केल्यास कडक कारवाई होऊन शक्य तितक्या लवकर निकाल लागुन आपल्याला शिक्षा व दंड मिळू शकतो, याची गुन्हेगाराला जाणीव होऊ शकते गुन्हेगाराला जमानत मिळायला नको. त्याला कारागृहात कुठलीही सुविधा मिळायला नको आणि विशेष म्हणजे ते उच्च प्रतिष्ठित असतील जसे चित्रपटक्षेत्रामधील अभिनेते, व्यापारी यासारख्यांना कुठलीच दया बाळगलेली नसावी. मग साहजिकच माहिला अत्याचाराला आळा बसेल. आजची तरूण पीढी कायद्याला जुमानत नाही कारण त्यांचे काठोर परिणाम भोगावे लागतात. हेच त्यांना माहीत नाही. अत्याचाराचे परिणाम काच होच होतात याचे ज्ञान शालेय अभ्यासक्रमात असायला हवे. जेणेकरुन येणारी पीढी ही स्त्रीयांचा मान-सन्मान ठेवील त्यांचा आदर करेल. आणि अत्याचार समाजातील व आपल्या संस्कृतीतीक अनिष्ट रुढींना वाचा फोडून करावी लागेल. हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. हिच स्त्रीला माहीला दिना खरी शुभेच्छा होईल.



# .....कविता विभाग.....

## १. मृत्यू



सजवत होते मला.
मी शांत निजलो होतो,
बहुतेक आसवांच्याा धारेनं
मी चिंब भिजलो होतो.

शेवटी अंघोळ ती
होती गरम पाण्याची...
ज्याला त्याला घाई
मला, डोळे भरून पाहण्याची

ज्याच्या खाद्यावर माझं
गेलं होत बालपण
त्यांनीच पुन्हा उचलून
घेतलं आज पण

जवळचे सारे होते
होतं कुणीतरी परकं...
नेवू नका मोठ्यानं
म्हणत होतं सारखं...



आज वेगळंच
काहीतरी हाडत होतं...
वैऱ्याचं ही प्रेम
माझ्यावर पडत होतं...

तिथपर्यंत नेऊन सुद्धा
माझ्यावर प्रेम लुटवत होते...
जोरजोरात रडुन
सगळे मला उठवत होते...

सरणावर झोपूनही
मी मौन पाळलं होतं...
जिव लावणाऱ्या माझ्यानीच
मला जाळलं होतं...

कु. तेजश्री राऊत
बी.ए.भाग १

# आयुष्य

आयुष्यभर सोबत असून,
जवळ कधी बसत नाही.
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही.



हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद

धाव धाव, धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही.
हृदयाचे पाऊल कधी
हळ्याकडे वळत नाही.

इतकं जणून झालं पण,
जगायला वेळ नाही.
पगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही

क्षण एक येईल असा,
घेवून जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास

अजूनही वेळ आहे
थोडं तरी पगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरून बघून घ्या.

कु. साक्षी कळसाईत
एम.ए. भाग २

# आयुष्याला द्यावे उत्तर

असे ज़गावे दुनियेमध्ये, आव्हानाचे लावुन अत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...

नको ती गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी तात्यांची
आयुष्याला भिडतांनाही, चैन करावी स्वप्नांची...

असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखुनी नजरमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर....



पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना
हसू असावे ओठांवरती, काळीज काढुन देतांना...

संकटासही ठणकावून सांगावे, आता ये बेहत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...

करून जावे असेही काही, दुनियेतुनी या जाताना,
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवटचा देताना....

स्वर कुठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर कातर,
नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर.

कु. साक्षी कळसाईत
एम.ए. भाग २



# कास्तकारी

येऱ्याबागळ्याचं काम नाही रे
कास्तकारी करणं,
मातीसाठी जगणं अन्
मातीसाठी मरणं,
तुमच्यासारखा पगार आमचा
कुठं दर महिन्याला येतो
नसतं ठाऊक शेत माउली
काय नेते, अन् काय देते
लग्न मरण म्हणजे आमच्यावर
संकटच येते,
सणासुदीला जीव सारा
रडकुंडीला येते
जेवा पाहिजे तवा कधी
पाणी येत नाही,
पिकलं कधी वावरात त
भाव भेटत नाही
जरी जगाचा पोशिंदा तरी घरात
चुल पेटत नाही
समदेयाले असते जीव प्यारा पण
आम्ही मेल्याबिगर कर्ज फिटत नाही,
किती सुखी असेल पण देशातला
शेतकरी त्याची शेती तंत्रशुध्द होते,
आमचे परंपरागत वखर डवरे नाही
गेले सरकार बी आमचेच
गलचट्या देते
कृषी प्रधान देश आपला
पण कृषि बजेट नाही
लोकांनी चहा विकणाऱ्याला देश दिला
तरी शेतकऱ्याले कोणी
पोरगी देत नाही.






## माणूस

लढायचे आहे रे
माणसात माणूसपण शोधायचं
आहे रे
त्याचे शरीर दिसते
माणुसकी ॲबसेन्ट असते
शोधायचं कुठं माणसाला
जग मानसाचंच पण माणूस
न मिळाला
मिळाला तो बारमध्ये
पण एखादा दिसतो दु:ख वाटणारा
माणुसकीचा महामेरू असणारा
माणुसकी गुण माणसाचा
कुत्र पण मान ठेवतो मालकाचा
जनावरं माणुसकीची आहे
पण आपल्यातच का बरं माणुसकी नाही ?

– कु. सोनिका अलोणे
(बी.ए. भाग-१)



## जीवन चक्र

जीवन चक्र हे
फिरत राहील ।
सुख-दु:ख हे
येतच राहील ।।
आसवाची संगत
सदाच राहील ।
कधी दु:खात तर
सुखातही राहील ।।
'विधिलिखित' हे
घडत राहील ।
तयासी संघर्ष
करत राहील ।।
संघर्षातून मार्ग
निघत राहील ।
जीवन चक्र हे
फिरत राहील ।।

– कु. सोनिका अलोणे
(बी.ए. भाग-१)



# स्वामी विवेकानंदांचे स्त्री-विषयक विचार

भारताचे नांव जगाला माहीत होण्याचे श्रेय स्वामी विवेकानंद यांना जाते. ज्या देशामध्ये स्त्रियांना योग्य सन्मान मिळतो आणि त्यांच्या सर्वांगीण विकासास अनुकूल असे वातावरण निर्माण करण्यात येते. तोच देश उन्नतावस्थेत पोहचत असतो. हे सत्य स्वामी विवेकानंदांनी पुरेपूर ओळखले होते, त्यामुळे त्यांनी आपल्या अनेक व्याख्यानातून आणि लेखनातून भारतीय स्त्री आदर्श कशी घेऊ शकेल याचे मनोज्ञ आणि मर्मग्राही विवेचन केले आहे.



